# मेट्रोची शेवटची 'टीबीएम' कार्यरत

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी )- भुयारी मेट्रो मार्गाचा शेवटची टीबीएम (टनेल बोअरिंग मशिन) आजपासून कार्यरत झाल्याने एकूण सतरा टीबीएम मशिन कार्यरत झाल्या आहेत. पॅकिज तीन मधील तानसा-२ ही टीबीएम मशिन वरळीच्या सायन्स म्युझियम येथे भूगर्भात सोडण्यात आली आहे.

पहिली टीबीएम मशिनचे शाफ्ट २०१७ रोजी नयानगरजवळ भूगर्भात सोडण्यात आली. त्यानंतर आता पॅकिज तीन तानसा -२ ही टीबीएम कार्यरत झाल्याने कुलाबा-बीकेसी-सिप्झ हा ३३.५ कि.मी.चा भूयारी मार्ग खणण्यासाठी १७ मशिन कार्यरत झाल्या आहेत. ३३.५ किं.मी.चा मार्ग असला तरी प्रत्यक्षात ५४ किमी. भूयार खणावे लागणार आहे. १७ टीबीएम मशिन पैकी १५ मशिननी सुरूवातीचा टप्पा पूर्ण केला आहे. तर ९ टीबीएम ह्या मुख्य टप्पा सुरू केला आहे.